# १० हजार विद्यार्थ्यांनी निवडला ऑफलाईन टू ऑनलाईन पर्याय



शिवाजी विद्यापीठातून...

## पदवी परीक्षांचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत कार्यक्षेत्रातील सुमारे १० हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाईन टू ऑनलाईनचा पर्याय निवडला आहे. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी.आदी परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाने संकेतस्थळावर जाहीर केले आहे.

विद्यापीठ परीक्षांना सुरुवात झाली आहे. काही तांत्रिक कारणास्तव बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बॅचलर ऑफ फूड टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, बी.एस्सी.फूड टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट विषयाच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या होत्या. त्याबाबतचे सविस्तर वेळापत्रक शनिवारी विद्यापीठाने जाहीर केले आहे. २३ ते २५ मार्चपर्यंत विद्यार्थ्यांना ऑफलाईन टू ऑनलाईन पर्याय निवडण्याची संधी दिली होती. त्यानुसार दहा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पर्याय निवडला आहे. त्यांना यूजर आयडी, पासवर्ड पाठविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी मॉक टेस्ट व परीक्षेसंदर्भातील संकेतस्थळावरील व्हिडीओ पाहून परीक्षांचे नियोजन करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी केले आहे.

Kolhapur Edition